# कारशेडसाठी कांजुरच योग्य

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या विरोधी मताला 'वनशक्ती'चे उत्तर

**म. टा. विशेष प्रतिनिधी,** मुंबई

कांजुरमार्ग येथील दलदलीच्या जमिनीवर कारशेड उभारायचा झाल्यास १५०० कोटींचा भूर्दंड सहन करावा लागेल, या मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यास 'वनशक्ती' या पर्यावरणवादी संस्थेने हरकत घेतली आहे. ब्रिमस्टोवॅडची झालेली चुकीची बांधकामे तसेच मलनि:सारणामुळे ही जमीन दलदलीची भासत असून, याच ठिकाणी कारशेड उभारल्यास मेट्रोचा विस्तार होऊन भविष्यात सरकारलाच फायदा होईल, असा दावा संस्थेने केला आहे.

सध्या जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोडवरील वाहतूक कमालीची वाढली आहे. कांजुर येथे कारशेड झाल्यास मेट्रो-३चा (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) विस्तार कांजुर आणि जोगेश्वरीपर्यंत होईल. परिणामी लोकांना सार्वजनिक वाहतुकीचा आणखी एक पर्याय उपलब्ध होईल. सरकारने त्यासाठी १५०० कोटी रुपये अतिरिक्त खर्च केले, तरी मेट्रोचा होणारा विस्तार आणि मिळणारे उत्पन्न लक्षात घेता हा खर्च अल्पावधीतच भरून निघेल, असा युक्तिवाद संस्थेचे अध्यक्ष डी. स्टॅलिन यांनी केला आहे. या प्रकल्पासाठी 'जायका' ही वित्तसंस्था अल्प व्याजदरात कर्ज देत असल्याने सरकारने या खर्चाचा बाऊ करू नये, अशी विनंती संस्थेने मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात केली आहे.



### डेब्रिजही याच जमिनीवर

कांजुरची जागा दलदलीची असल्याचा दावाही संस्थेने खोडून काढला आहे. ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाच्या चुकीच्या कामांमुळे मागील १५ वर्षांपासून या भागात येणारे भरतीची पाणी थांबले आहे. शिवाय पाणस्थळ जागाही नामशेष झाली आहे. सध्या शेजारच्या वस्त्यांमधील मलनि:सारण या जमिनीवरच होते. हे सांडपाणी थांबवले, तर महिनाभरात ही जमीन दगडासारखी कडक होईल आणि सध्याची थोडीबहुत दलदल नष्ट होईल, असे संस्थेचे म्हणणे आहे. मुंबईच्या विविध भागांतील बांधकामांचे डेब्रिज या जमिनीवर टाकले, तरीही जमीन आणखीनच मजबूत होईल आणि कारशेड उभारता येईल, असा पर्याय संस्थेने सुचवला आहे.

के. के. चौधरी






मानखुर्दहून वाशी खाडीकडे जाणाऱ्या शीव-पनवेल हायवेवरील हा पादचारी पूल रविवारी तोडण्यात आला. दोन दिवसांपूर्वी एका कंटेनरने या पुलाला धडक दिल्याने तो खिळखिळा बनला होता. अखेर त्याचे दोन तुकडे करून हा धोका टळला असला, तरी पादचाऱ्यांना मात्र रस्ता ओलांडताना धोका स्वीकारावाच लागत आहे.

# होळीकाळात एसटीला १२ कोटींचे उत्पन्न

**म. टा. खास प्रतिनिधी,** मुंबई

होळी सणानिमित्त कोकणात जाणाऱ्या प्रवाशांच्या वाढत्या संख्येमुळे एसटी महामंडळाच्या महसुलात काही प्रमाणात वाढ झाली आहे. २१ ते ३१ मार्च या कालावधीसाठी कोकण गाठलेल्या प्रवाशांमुळे एसटीला १२ कोटी रुपयांचा महसूल मिळाला आहे.

मुंबईहून कोकणकडे जाणाऱ्यांसाठी नेहमीच एसटीचा पर्याय निवडला जातो. त्यामुळेच गणेशोत्सव, उन्हाळी सुट्टी, जत्रांचा कालावधी तसेच होळीच्या दरम्यान कोकणकरांची एसटी प्रवासासाठी गर्दी होते. हेच हेरून एसटी दरवर्षी या काळात फेऱ्या वाढवते. यंदा तर होळीच्या दरम्यान लागून सुट्ट्या आल्याने एसटीने विशेष गाड्या चालवल्या व त्याचा चांगला परिणाम दिसून आला. एसटी महामंडळाने होळी आणि त्यापाठोपाठ आलेल्या सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर २१ ते ३१ मार्च या कालावधीत जादा गाड्यांचे नियोजन केले. या ११ दिवसांपैकी २४ ते २७ मार्च अशी सलग चार दिवसांची सुट्टी आल्याने एसटीच्या प्रवासी संख्येत पाच टक्क्यांनी वाढ झाली. तर, साधारणपणे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या उत्पन्नात ४ कोटी ५ लाख रुपयांनी वाढ झाली आहे. दहावी आणि बारावीच्या परीक्षा संपल्यामुळे प्रवासी संख्येत वाढ झाल्याचे सांगण्यात येते.

शाळा, कॉलेजच्या परीक्षांचा कालावधी आणि दुष्काळाचे सावट लक्षात घेता एसटीने मार्च २०१६च्या पहिल्या दोन आठवड्यांत सरासरी प्रवासी संख्या केवळ ५२ टक्क्यांच्या आसपास होती. हे प्रमाण २१ मार्चनंतर वाढले असून, शेवटच्या आठवड्यात प्रवासी संख्येत पाच टक्क्यांनी वाढ झाली आहे. या कालावधीत एसटीच्या सहा प्रादेशिक विभागापैकी सर्वाधिक उत्पन्न मुंबई प्रदेशाने मिळविले आहे.



# संसर्ग रोखण्यासाठी रोगप्रतिकारशक्ती वाढवा

**सार्स, स्वाइन फ्लू, एबोला, झिका या आजारांसह माणसांमध्ये आढळणाऱ्या ६९ टक्के आजारांचे मूळ प्राण्यांमध्ये असल्याचे मुंबईत झालेल्या एका परिषदेत तज्ज्ञ डॉक्टरांनी सांगितले. आजच्या घडीला अनेक घरांमध्ये पाळीव प्राणी आहेत, कबुतरांचा त्रास आहे. त्यांच्यामुळे संसर्गाची भीती आहे. वटवाघळांमुळे तर १६ प्रकारचे संसर्ग होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर संसर्गजन्य आजारांचे तज्ज्ञ व प्रख्यात सल्लागार डॉ. ओम श्रीवास्तव यांच्याशी केलेली बातचीत...**



**डॉ. ओम श्रीवास्तव**
संसर्गजन्य आजारांचे सल्लागार




टॉक टाइम

**■ मुंबईकरांच्या आरोग्याला वटवाघळांचा धोका किती आहे?**
मुंबईत वटवाघळे खूप आहेत. चेंबूरपासून दक्षिण मुंबईपर्यंत १४ ते १५ ठिकाणी वटवाघळांची संख्या खूप आहे. वटवाघळांमध्ये १६ प्रकारचे विषाणू असतात. रेबिससोडून इतर संसर्ग त्यांच्यामुळे होतो. पण, वटवाघळे चावली, लाळ किंवा त्यांच्या विष्ठेतूनच संसर्ग होतो. त्यातून श्वसनाचा विकार होऊ शकतो किंवा इतर अनेक विषाणू पसरण्याचा धोका असतो. मॅकॅनिमो नावाचा संसर्गही होऊ शकतो. प्रत्येक वटवाघळांमध्ये विषाणू असतातच असे नाही. पण, त्यांच्यात विषाणू असण्याची शक्यता असते. ज्या ठिकाणी वटवाघळांची संख्या अधिक आहे, अशा ठिकाणच्या लोकांना नेमका आजार कशामुळे हे अनेकदा समजत नाही. ते डॉक्टरांचा सल्ला घेत नाहीत.

**■ पाळीव प्राण्यांमुळेही संसर्गाचा धोका असतो, मग ते घरात ठेवूच नयेत का?**
पाळीव प्राणी घरात ठेवण्यास हरकत नाही. पण, त्यांच्यापासून काही त्रास होत असेल तर त्याचा शोध घेतला पाहिजे. घराजवळ कबुतरांचे वास्तव्य असेल, तर श्वास घेण्यास किती त्रास होतो ते तुम्ही तपासून पाहिले पाहिजे. श्वसनाचा संसर्ग किती होतो यावर लक्ष ठेवले पाहिजे. पाळीव प्राणी ठेवायेच नाहीत, असे सांगणार नाही. पण, त्यांच्यापासून होणाऱ्या आजारांबाबत आपल्यामध्ये जागरूकता असणे आवश्यक आहे. मात्र, धोका अधिक असेल तर लस घेणे गरजेचे आहे.

**■ प्रत्येक प्रौढाने लस घेतलीच पाहिजे का?**
होय, प्रत्येक प्रौढाने लस घेतली पाहिजे. स्वाइन फ्ल्यूशिवाय एन्फ्लुएन्झा, टायफॉइड अशा अनेक लसी आहेत. प्रत्येक संसर्गजन्य आजाराची वेगळी लस आहे. पण, डॉक्टरांच्या सल्ल्याने लस घ्यावी. एकच लस घेतली, तर सर्व आजारांवर मात करता येत नाही. लस घेतली म्हणजे आजार होणारच नाही, असेही नाही फक्त धोका कमी होतो. आजाराची तीव्रता कमी होते.

**■ मुंबईत कोणते संसर्गजन्य आजार अधिक आढळतात?**
असे सांगता येणे कठीण आहे. एखादा आजार जास्ती व एखादा आजार कमी आहे, असे म्हणता येणार नाही. तसे खूप आजार आहेत. त्यांची यादी करणे गरजेचे आहे. संसर्गजन्य आजारांचा मुंबईला मोठा धोका आहे. वेगवेगळ्या काळात वेगवेगळा संसर्ग होण्याचा धोका असतो. सध्या तीव्र उन्हाळा सुरू आहे. या काळात एन्फ्लुएन्झा व व्हायरल डायरियाचा मोठा धोका निर्माण होऊ शकतो. बाहेरचे अन्न खाणे धोकादायक असू शकते, कारण उन्हाळ्याच्या दिवसात अन्नपदार्थ लवकर खराब होतात. त्यामुळे पोटाचे विकार होण्याची जास्त भीती असते.

**■ नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी?**
सर्वात महत्त्वाचे म्हणजे ताजे अन्नपदार्थ व स्वच्छ पाणी पिणे आवश्यक आहे. समजा आपण एखादा खाद्यपदार्थ खाल्लाच व त्यामुळे पोटाचे विकार किंवा संसर्ग होण्याची आपल्याला भीती वाटली, तर इलेक्ट्रोलाइट, पाणी, ज्यूस असे पातळ पदार्थ घ्यावे. म्हणजे शरीरातील पाण्याची पातळी राखली जाईल याची काळजी घ्यावी व आराम करावा. एन्फ्लुएन्झाची लागण झाली, तर लस घ्यावी. पण, आजार होऊच नये, असे वाटत असेल, तर सर्वप्रथम प्रतिकारशक्ती वाढवा. सध्या सर्वांची जीवनशैली बदललेली आहे. त्यात धावपळ अधिक होते. शरीराला आराम मिळत नाही. संसर्ग होण्याचा संबंध रोगप्रतिकारशक्तीशी आहे. त्यासाठी जीवनशैली बदललीच पाहिजे. शरीराचे स्वास्थ चांगले ठेवण्यासाठी रोगप्रतिकारशक्ती वाढवली पाहिजे.

**(राजेश चुरी )**

TIMES TRIBUTE
PAYING HOMAGE TO THE DEPARTED SOUL http://tributes.timesofindia.com

पुण्यतिथी

२५ वी भावपूर्ण श्रध्दांजली



स्वातंत्र्य सैनिक व माजी सभापती वसई
कै. श्री. भालबा म. पंडित
मृत्यू : ०४ एप्रिल १९९१
समाजाला दिशा दिली,
सुसंस्कृतपणाला आशा दिली,
उत्सवाच्या वाटचालीने,
गावाचे भविष्य सजले,
पंडित तुम्ही माणुसकीचे
भालचंद्र तुम्ही समाजाचे..!
श्रीमती सुधा भालचंद्र पंडित व
समस्त पंडित परिवार
आगाशी चाळपेठ

पुण्यस्मरण

प्रथम पुण्यस्मरण



कै. श्री. शंकर
रघुनाथ परब (दादा)
जन्म : १०-१२-१९५६
मृत्यु : ०४-०४-२०१५
पत्नी :- श्रीमती श्वेता
शंकर परब
मुलगी :- सौ. सारीका
विक्रांत परब.

REMEMBRANCE
SHARING MEMORIES



प्रथम स्मृतिदिन
कै. कस्तुर दिवाकर मांजरेकर
जन्म – 6–4–1918
मृत्यू – 4–4–2015
आई तुझी आठवण येते
वसंत, मनिषा मांजरेकर (मुलगा, सून), सुषमा, उदय पौडवाल (मुलगी, जावई), अभिजीत, अरुंधती (नातवंड), रोहन, साहील, रागा (पतवंड)



भावपूर्ण श्रध्दांजली
अकरावे पुण्यस्मरण
कै. श्री. भालचंद्र शंकरराव आरोटे
(गाव कामगार तलाठी – रिटायर्ड)
(श्रीरामपूर – मु. गां. जामगांव, ता. अकोले, जि. नगर)
(०२/०६/१९२१ ते ०४/०४/२००५)
ती. कै. नानांस भावपूर्ण श्रध्दांजली!
शोकाकूल : विजय आरोटे व ईतर मुलगे, मुली, सुना, नातवंडे, पतवंडे व समस्त आरोटे परिवार. संपर्क 09820470861



भावपूर्ण श्रध्दांजली
प्रथम स्मृतिदिन
कै. मोरेश्वर महादेव राऊत
उंबर गोठण – राऊत आळी, विरार (प.)
जन्म – १०/०५/१९२७
मृत्यू – ०४/०४/२०१५
दादा, तुझ्या श्रमाचं साफल्य
आम्हाला तू बहाल केलंस.
आपली खूप आठवण येते.
पत्नी : यमुना मोरेश्वर राऊत, बहिण : श्रीमती मालतीबाई ह. चौधरी, मुलगे : काशिनाथ, नरेंद्र, अभय, मुली : कल्पिता, रजनी, प्रमोद (वृंदा), सूना : वृंदा, उषा, नातवंडे : प्राजक्ता, प्रथमा, अभिज्ञा, धनीषा, साक्षी, मितल, सागर, अमेय, अक्षय, नमिता

# दुर्मिळ पुस्तकांचे आता होणार डिजिटायझेशन

**म. टा. खास प्रतिनिधी,** मुंबई

दादरच्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात सन १८४२पासूनची पुस्तके उपलब्ध आहेत. सुमारे १७४ वर्षांचा कालावधी या पुस्तकांनी पाहिला आहे. या काळामध्ये या पुस्तकांची अवस्था सध्या काय असेल याची केवळ कल्पनाच करता येते. ही पुस्तके काळाच्या ओघात नष्ट होऊ नयेत यासाठी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या दादर विभागाने त्यांचे डिजिटायझेशन करायला सुरुवात केली आहे.

मार्चच्या दुसऱ्या पंधरवड्यापासून डिजिटायझेशनचा प्रकल्प हाती घेण्यात आला असून, हा संपूर्ण प्रकल्प सुमारे १ कोटी रु.चा आहे. याचा पहिला टप्पा ५० हजार पानांचा असून, यामध्ये सुमारे अडीच लाख पुस्तके डिजिटाइज्ड केली जाणार असल्याचे दादर विभागाचे कार्यवाह प्रेमानंद भाटकर यांनी सांगितले. मुंबई मराठीच्या दादरच्या शाखेकडे सध्या २० लाखांचा निधी उपलब्ध आहे. पहिल्या टप्प्यासाठी अडीच लाख रु.चा खर्च अपेक्षित आहे. गेल्या १५ दिवसांमध्ये सुमारे ७५०० पानांचे डिजिटायझेशन झाले आहे. या निधी संकलनासाठी सुलभा देशपांडे, भालचंद्र नेमाडे, अरुण साधू, यशवंत देव या दिग्गज साहित्यिक-कलाकारांनी आर्थिक मदत केली आहे. शिवेसना नेते मनोहर जोशी यांनीही या प्रकल्पासाठी मदत केल्याचे भाटकर यांनी सांगितले. पहिल्या टप्प्यातील कामाची संपूर्ण तपासणी झाल्यानंतर मग उर्वरित टप्प्यातील पुस्तकांच्या डिजिटायझेशनचे काम हाती घेण्यात येणार आहे.



मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या दादर शाखेचा प्रकल्प

### तुमचाही हवा हातभार

या प्रकल्पासाठी १ कोटींचा खर्च असल्याने समाजातील पुस्तकप्रेमींनी, साहित्यरसिकांनी यासाठी आर्थिक हातभार लावावा, असे आवाहन करण्यात आले आहे. ही दुर्मिळ पुस्तके पुन्हा एकदा रसिकांना उपलब्ध करून देण्यासाठी हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. डिजिटायझेशनची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मग वेबसाइटच्या माध्यमातूनही ही डिजिटाइज्ड माहिती वाचकांसाठी उपलब्ध होऊ शकते, असेही यावेळी सांगण्यात आले. आर्थिक मदतीसाठी संपर्क- २४३६१९०५.

# विश्वकोशासाठी विद्यार्थ्यांची मदत

**म. टा. प्रतिनिधी,** मुंबई

विश्वकोश अद्ययावत करण्यासाठी आता राज्यभरातील विविध विद्यापीठांतील विद्यार्थ्यांची मदत घेतली जाणार आहे. विविध विषयांसंदर्भातील नोंदीसाठी माहिती गोळा करणे यासाठी राज्यातील विविध विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थ्यांना ज्ञानमंडळाच्या माध्यमातून एकत्र आणले जाणार आहे. त्यासाठी मुंबई विद्यापीठ मुख्य केंद्र म्हणून काम करणार असून, यासंदर्भात नुकताच विश्वकोश निर्मिती मंडळ आणि मुंबई विद्यापीठामध्ये करार करण्यात आला.

विश्वकोश अद्ययावत करण्यासाठी सुमारे ६० ज्ञानमंडळांची निर्मिती करण्यात येणार आहे. यामध्ये मुंबई विद्यापीठाच्या मदतीने १० ज्ञानमंडळे स्थापन केली जाणार आहेत. यात अर्थशास्त्र, मानसशास्त्र, गणित व सांख्यिकी, वनस्पतिशास्त्र, जैवविविधता, जीवशास्त्र, भौतिकी, आधुनिक तत्त्वज्ञान आणि तत्त्वज्ञ आदी विषयांचा समावेश आहे. अशाच पद्धतीने डेक्कन महाविद्यालय, भांडारकर संस्था यांच्याशीही चर्चा झाली असून, पुण्याच्या कृषी विद्यापीठाशीही बोलणी सुरू असल्याचे विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष दिलीप करंबेळकर यांनी सांगितले. या संपूर्ण चर्चेसाठी साधारण दोन महिन्यांचा कालावधी लागणार असून, त्यानंतर या नोंदींसंदर्भातील कामाला सुरुवात होईल. प्रत्येक विद्यापीठातील तज्ज्ञांना या कामामध्ये सामावून घेतले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



अद्ययावती करणासाठी मुंबई विद्यापीठ आणि निर्मिती मंडळात करार

ज्ञानमंडळाच्या रचनेमध्ये पाच तज्ज्ञांचे सल्लागार मंडळ व एक समन्वयक यांचा समावेश असेल. संशोधक विद्यार्थ्यांकडून उपलब्ध झालेली माहिती संकलित करून त्यानंतर या नोंदी विश्वकोश मंडळाच्या वेबसाइटवर वाचकांना उपलब्ध करून देण्यात येतील. मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने विश्वकोशाच्या २० खंडांची निर्मिती केली असून, या २० खंडांच्या नोंदींचे अद्ययावतीकरण करणे, विविध विषयांवरील नव्या माहितीची त्यात भर टाकणे, सध्याच्या नोंदींचे पुनर्लेखन करणे ही कामेही या माध्यमातून करण्यात येईल. यासाठी निर्माण करण्यात आलेली ज्ञानमंडळे एकमेकांशी कराराच्या माध्यमातून जोडण्यात आली आहेत.

### जागतिक ज्ञान मराठीत येईल

या करारामुळे विविध विषयांवरील तज्ज्ञांची एक साखळी निर्माण होऊन तिच्याद्वारे सर्व विषयावरचे जागतिक ज्ञान मराठी भाषेत आणण्याची प्रक्रिया निरंतरपणे चालेल, अशी अपेक्षा आहे. विश्वकोश मंडळातील विविध सदस्य त्यांच्याशी निगडित असलेल्या विषयांच्या ज्ञानमंडळाचे पालक म्हणून काम करतील. या संपूर्ण प्रक्रियेमुळे विश्वकोशाचा हा उपक्रम यशस्वी होणार असल्याचा आशावाद यावेळी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांनी व्यक्त केला. डॉ. संजय देशमुख, दिलीप करंबेळकर, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या सचिव सुवर्णा पवार, डॉ. बाळ फोंडके, डॉ. नीरज हातेकर आणि प्रा. गौरी माहुलीकर यांच्या उपस्थितीत विश्वकोश निर्मिती मंडळ आणि मुंबई विद्यापीठ यांच्यामध्ये करार झाला.

# शाळांचा आठवडा पाच दिवसांचा करा

**मुंबई :** दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शाळांचा आठवडा पाच दिवसांचा करावा, अशी मागणी शिक्षक परिषदेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे केली आहे. राज्यात पाणीटंचाई कायम असेपर्यंत जर शाळांचा आठवडा पाच दिवसांचा केला, तर पाण्याची व विजेची मोठ्या प्रमाणावर बचत होईल, असे या निवेदनात म्हटले आहे.

'मटा' ॲपवरील सर्वाधिक चर्चेतील बातमी

आत्महत्या करण्याआधी रडत होती प्रत्युषा



'बालिका वधू' मालिकेमुळे लोकप्रिय झालेली अभिनेत्री प्रत्युषा बॅनर्जी आत्महत्येच्या काही तास आधी रडत होती.

मटा ॲप डाऊनलोड करा
app.mtmobile.in
मिस्ड् कॉल द्या
1800-103-8973

# सामाजिक बहिष्कार; न्यायालयाचा दणका

**म. टा. खास प्रतिनिधी,** मुंबई

मुरुडमधील सामाजिक बहिष्काराच्या वेगवेगळ्या घटनांबाबत आतापर्यंत काय तपास केला आणि काय कारवाई केली, याविषयीचा अहवाल मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी मुरुड-जंजिरा पोलिस ठाण्यातील तपास अधिकाऱ्यांकडे मागितला. त्यांना २७ एप्रिल रोजी न्यायालयात उपस्थित राहून अहवाल देण्यास न्यायालयाने सांगितले आहे.

याचिकादार जगन्नाथ वाघेरे व संतोष जाधव यांनी यासंदर्भात केलेल्या याचिका न्यायालयात प्रलंबित आहेत. यासंदर्भात शुक्रवारी न्या. अभय ओक व न्या. प्रकाश नाईक यांच्या खंडपीठापुढे झालेल्या सुनावणीत, काही दिवसांपूर्वी आरोपींनी एका तक्रारदार महिलेला मारहाण केल्याचे याचिकादारांच्या वकिलांनी निदर्शनास आणले. तसेच त्याविषयी एफआयआर नोंद होऊनही कारवाई झालेली नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे खंडपीठाने याविषयी सरकारी वकिलांना विचारणा केली असता कारवाई होत असल्याचे त्यांनी सांगितले. परंतु, नेमकी माहिती उपलब्ध नसल्याने खंडपीठाने तपास अधिकाऱ्यांना अहवाल देण्यास सांगून सुनावणी २७ एप्रिलला ठेवली.

## फिक्की फ्रेम्स परिषदेत मराठी सिनेजगताचा विश्वास

# प्रादेशिकता जपल्यास मराठी सिनेमा ५० कोटींपार

**म. टा. प्रतिनिधी,** मुंबई

'दाक्षिणात्य सिनेमांचे रिमेक किंवा बॉलिवूडची नक्कल करण्याऐवजी मराठी चित्रपटसृष्टीने अस्सल मराठी मातीतल्या विषयांवर सिनेमे बनवायला हवे. मूळ प्रादेशिकता जपल्यास ५० कोटी रु.च्या कमाईचा टप्पा दूर नाही,' असे मत मराठी चित्रपट क्षेत्रातील दिग्गज मंडळींनी 'फिक्की फ्रेम्स २०१६' या परिषदेच्या '५० कोटींचा पुढचा टप्पा गाठणारा मराठी सिनेमा' या सत्रात मांडले.




मराठी इंडस्ट्रीत आशय आणि दिग्दर्शक उजवा असल्याने त्याची तुलना युरोपीयन सिनेमाशी केली जाते. याबद्दल ज्येष्ठ अभिनेता-दिग्दर्शक-निर्माता महेश मांजरेकर सांगतात, 'हिंदी सिनेमा बघणाऱ्या मराठी प्रेक्षकांना चित्रपटगृहापर्यंत ओढून आणण्यासाठी मराठी मातीतल्या विषयांची गरज आहे. आशयाच्या जोरावर अमराठी लोकही मराठी सिनेमे बघतील. चित्रपटात चांगला आशय असणे महत्त्वाचे आहे.' तर, 'महाराष्ट्रातील सांस्कृतिक ठेवा जपणारे चित्रपट चांगला गल्ला जमवण्यात यशस्वी होत आहेत', अशी माहिती एस्सेल व्हिजन मराठी फिल्म डिव्हिजनचे बिझनेस हेड निखिल साने यांनी दिली. 'मराठी इंडस्ट्रीत आशय हाच चित्रपटाचा हिरो असतो. मराठी गाभा असलेले चित्रपट हेच इंडस्ट्रीचे भविष्य आहे. मुळात जे हिंदीला जमणार नाही, ते मराठी इंडस्ट्रीने पुरवणे गरजेचे आहे', असे मत 'लोकमान्य: एक युगपुरुष'चे दिग्दर्शक ओम राऊत यांनी मांडले.

आज मराठी सिनेमांना बॉलिवूडसह हॉलिवूडची तगडी स्पर्धा असल्याने प्रेक्षकांना चित्रपटगृहाकडे आणणे कठीण आहे. मात्र चित्रपटाची मुळे जर महाराष्ट्राशी संबंधित असतील किंवा त्याचा इतिहास मराठमोळ्या संस्कृतीकडे ओढला जाणारा असेल तर अधिकाधिक लोक आकर्षित झाल्याचे दिसून आल्याचे इरॉस इंटरनॅशनलच्या रिजनल फिल्म्सचे बिझनेस हेड समीर गोगटे सांगतात. यावर्षीच्या राष्ट्रीय पुरस्कारांच्या ज्युरी समितीचे अध्यक्ष असलेले ज्येष्ठ दिग्दर्शक रमेश सिप्पी यांनीसुद्धा मराठी सिनेमांचे विशेष कौतुक केले.

### बॉक्स ऑफिसवर मराठी ठसका

आठ वर्षांपूर्वी 'दे धक्का'ने १२ कोटी कमावले. त्यानंतर २०१०मध्ये 'मी शिवाजी राजे..'ने २५ कोटी तर पुढे २०१३मध्ये 'दुनियादारी'ने २६ कोटींचा आकडा पार केला. गेल्या तीन वर्षांत 'दुनियादारी', 'लई भारी', 'टाइमपास' आणि आता 'नटसम्राट'ने सगळेच विक्रम मोडले. विशेष म्हणजे या बड्या सिनेमांसोबातच 'फँड्री', 'किल्ला', 'एलिझाबेथ एकादशी', 'काकस्पर्श' असे महाराष्ट्राची पार्श्वभूमी असलेले वेगळ्या धाटणीचे सिनेमेही बॉक्स ऑफिसवर तितकेच उत्तम चालले.

### तुर्कीशी पडद्यावर सहकार्य

भारत आणि तुर्कीतील सिनेमा आणि टीव्ही क्षेत्रातील संबंध दृढ व्हावे यासाठी काही नवीन महत्त्वाची पावले उचलली गेली आहेत. प्रथमच इस्तंबूल चेम्बर ऑफ कॉमर्स टुरिझमच्या नेतृत्वाखाली तुर्की कंपन्यांचे काही प्रतिनिधी 'फिक्की फ्रेम्स'ला आले. भविष्यात आशयनिर्मितीसाठी टीआरटी या प्रसारकांनी दूरदर्शनसोबत करार करायचे ठरवले आहे. तसेच २०१८पर्यंत तुर्कीकडून २ कोटी डॉलर्सच्या प्रोजेक्ट भारतात येतील. यंदा मामि सिनेमहोत्सवातही तुर्की सिनेमा दाखवला जावा यादृष्टीने प्रयत्न केले जात आहेत.